# द्राक्षांचे मोल

धनश्री हळबे

**राज्य साधन केंद्र, पुणे**
जे. पी. नाईक पथ, १२८/२ कोथरूड, पुणे ४११ ०२९

srcpune.nic.in

# द्राक्षांचे मोल

**श्रेणी** : I

**प्रथम आवृत्ती** : जानेवारी २००३

srcpune.nic.in

**संपादक** : डॉ. द. खं. पोखरापूरकर

**प्रकाशक** : राज्य साधन केंद्र, पुणे

© **राज्य साधन केंद्र, पुणे**

१२८/२, जे. पी. नाईक पथ,

कोथरूड, पुणे ४११ ०२९

**आतील चित्रे व मुखपृष्ठ** : प्रभाकर काटे

srcpune.nic.in

**सजावट व मांडणी** : श्रीधर पाटील, नंदन खळे

**मुद्रक** : प्रिंट इंप्रशन्स, हडपसर, पुणे ४११ ०१३

**किंमत** : रु. ९.००

# प्रस्तावना

प्रौढांचे काही बोल त्यांच्या अनुभवातून आलेले असतात. एखादी गोष्ट स्वतःच्या फायद्यासाठी न करता जर ती इतरांच्या फायद्यासाठी केली तर त्याचे मोल अधिक असते. याच कल्पनेवर आधारित एक सूफी कथा नवसाक्षरांसाठी या पुस्तिकेत दिली आहे. द्राक्षांचे मोल हे ती कुणासाठी लावली यावरून कमी किंवा जास्त ठरविता येते असा या गोष्टीचा सारांश आहे. आमच्या नवसाक्षरांना ही गोष्ट भावेल याची खात्री आहे.

srcpune.nic.in

**डॉ. द. खं. पोखरापूरकर**
**संचालक**
राज्य साधन केंद्र, पुणे

# द्राक्षांचे मोल



srcpune.nic.in

एका गावात एक शेतकरी राहत होता. त्याने एक द्राक्षाचा वेल लावला. तो सांगे, ‘‘हा वेल इतर वेलींसारखा नाही.’’ लोक विचारीत, असं काय विशेष आहे त्यात?’’

तो सांगे, ‘‘या वेलीला द्राक्षे लागणार आहेत. पण खूप दिवसांनी लागणार आहेत.’’ लोकांनी विचारलं, ‘‘किती दिवसांनी लागतील?’’ शेतकरी म्हणाला, ‘‘वेलीला तीस वर्षांनी द्राक्षे लागणार आहेत.’’



srcpune.nic.in

लोक म्हणाले, “असा वेल लावलाच कशाला?” शेतकरी यावर काहीच बोलला नाही.

त्या गावात एक श्रीमंत माणूस रहात होता. शेतकऱ्याच्या वेलाची बातमी त्याच्या कानी पोहोचली. तेव्हा तो शेतकऱ्याचा वेल बघायला त्याच्या शेतात गेला.

srcpune.nic.in



तो बोलला, “तुझ्या वेलाला तीस वर्षांनी द्राक्षे येणार?” शेतकरी म्हणाला,

‘‘होय मालक, ते खरं आहे.’’ तो म्हणाला, ‘‘तू तोपर्यंत जिवंत राहशील का?’’



शेतकरी म्हणाला, ’’ते मी कसं सांगू? कदाचित मी नसेनही. मला ही द्राक्षे मिळणारही नाहीत.’’ ‘‘मग हा वेल लावलास कशाला?’’ त्या माणसाने विचारले.

srcpune.nic.in

शेतकरी म्हणाला, ‘‘माझ्या मुलांना व नातवांना द्राक्षे मिळतील. आपल्या आजोबांनी लावलेल्या झाडांची फळे आपण

खातो. आणि ही द्राक्षे इतर द्राक्षांसारखी नाहीत. ही खूप गोड असणार हे मला माहीत आहे.''

तो श्रीमंत माणूस म्हणाला. ''ठीक आहे! वेलीला द्राक्षे लागली की तू मला आणून दे.'' शेतकऱ्याने ते कबूल केले.

तीस वर्षे गेली. शेतकरी म्हातारा झाला. त्या श्रीमंत माणसाचे सारे केस पांढरे झाले. वेलींना बहर आला, वेलींवर द्राक्षांचे घड लटकू लागले. शेतकरी म्हणाला त्याप्रमाणे द्राक्षे खूप गोड होती.

शेतकऱ्याला त्या श्रीमंत माणसाची आठवण आली. एका टोपलीत द्राक्षे घेऊन तो त्या माणसाकडे गेला. त्या माणसाचे घर म्हणजे राजवाडाच होता. दरवाजाशी पहारेकरी उभा होता. शेतकऱ्याने द्राक्षे

srcpune.nic.in



srcpune.nic.in

आणली आहेत, असा निरोप त्याच्याबरोबर पाठवला.

तो श्रीमंत माणूस बाहेर आला. त्याने म्हाताऱ्या शेतकऱ्याला ओळखले. तो त्याला आत घेऊन गेला. त्याने द्राक्षे खाऊन पाहिली. आजपर्यंत त्याने इतकी गोड द्राक्षे कधीच खाल्ली नव्हती.



त्या श्रीमंत माणसाला खूप आनंद झाला. त्याने ती द्राक्षे ठेवून घेतली. टोपली

srcpune.nic.in

भरुन पैसे त्याने शेतकऱ्याला दिले. शेतकरी आनंदाने घरी परतला.

शेतकऱ्याला टोपलीभर पैसे मिळाले ही बातमी गावभर पसरली.

एका बाईला वाटले श्रीमंत माणसाला द्राक्षे फार आवडतात. तीही एक द्राक्षांची टोपली घेऊन त्याच्याकडे गेली. त्याला निरोप पाठवला, माझ्याही द्राक्षांचे टोपलीभरुन पैसे द्यावेत.



तो श्रीमंत माणूस बाहेर आला. त्याने विचारले, ‘‘तू द्राक्षांची लागवड केव्हा केलीस?’’ ती म्हणाली, ‘‘आत्ताच तर केली.

तो माणूस म्हणाला, ‘‘शेतकऱ्याची द्राक्षवेल तीस वर्षांपूर्वीची आहे. त्याने ती आपल्या पुढच्या पिढीसाठी लावली. द्राक्षे खायला जिवंत राहू याचीही त्याला खात्री नव्हती. तरीही त्याने ती लावली. त्यामुळे त्या द्राक्षांचे मोल अधिकच आहे.’’

(सुफी कथा)

❖❖❖

srcpune.nic.in